जमिनीच्या अकृषिक वापरासाठी
परवानगी देताना वापरावयाच्या
**प्रचलित पध्दतीत सुधारणा.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र.एनएपी १००१/प्र.क्र.३४/ल-२
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक:- १३. ११. २००१

पहा :- शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र:एनएपी १०८८/ प्र.क्र. १२७५/ल-२, दिनांक १२/१०/१९८८.

परिपत्रक:-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींनुसार बिनशेती परवानगीसाठी अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यावर सदर अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून किंवा अर्जदारास पोच दिल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत बिनशेती परवानगीबाबत अंतिम निर्णय घेणे जिल्हाधिकारी यांना बंधनकारक आहे. आणि जिल्हाधिकारी यांनी त्यांचा निर्णय ९० दिवसांच्या आत अर्जदारास कळविला नाही तर अर्जदारास बिनशेती परवानगी मिळाली असे गृहित धरण्यात यावे. अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग, क्रमांक:-एनएपी १०८८/ १२७५/ल-२, दिनांक १२/१०/१९८८ मध्ये जिल्हाधिकारी यांनी सदर अर्ज तात्काळ निकाली काढण्याच्या दृष्टीकोनातून अवलंबवयाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. असे असून सुध्दा अर्जदारास संबंधित विभागाकडून 'ना हरकत' प्रमाणपत्र दाखला मिळण्यास अक्षम्य विलंब होतो. तसेच, सध्या प्रचलित असलेली कार्यपध्दती ही असमाधानकारक, क्लिष्ठ, वेळ काढू आणि गैरव्यवहारास वाव देणारी आहे असे शासनाकडे महाराष्ट्राच्या सर्व भागातून प्राप्त झालेल्या अकृषिक परवानगी मिळण्यास होत असलेल्या विलंबाच्या तक्रारींवरुन दिसून आले. सदर तक्रारींची दखल घेवून मा.मुख्यसचिवांनी संबंधित अधिका-यांची दिनांक ११/६/२००१ रोजी एक बैठक बोलावली. सदर बैठकीत विविध विभागाच्या 'ना हरकत' दाखल्याची किंवा कागदपत्रांची संख्या कमी करणे आणि सदर 'ना हरकत' दाखले / कागदपत्रे मिळण्यास संबंधित विभागाकडून लागणारा कालावधी कमी करणे आवश्यक असे निष्कर्ष काढण्यात आले.

२. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, जिल्हाधिकारी यांनी अकृषिक परवानगीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाबाबत शासन परिपत्रक क्र.एनएपी१०८८/प्र.क्र.१२७५

/ल-२ दिनांक १२/१०/१९८८ मधील तरतुदीं नुसार वापरावयाच्या पध्दतीच्या अनुषंगाने कार्यवाही करताना खालील आदेशांचीही अंमलबजावणी करावी.

१) अकृषिक परवानगीसाठी ज्या विविध विभागांची 'ना हरकत' प्रमाणपत्रे आवश्यक असतात, त्यापैकी बहुतांश विभागाची कार्यालये जिल्हाधिकारी कार्यालयातच असल्यामुळे त्या विभागांची ' ना हरकत' प्रमाणपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयाने परस्पर प्राप्त करुन घ्यावीत. ती जबाबदारी अर्जदारावर टाकू नये.

२) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून घ्यावयाच्या ' ना हरकत' प्रमाणपत्राबाबत असे सुचविण्यात येते की, महाराष्ट्र विद्युत मंडळाने त्यांच्या उच्च दाबाच्या तारा जमिनीच्या कोणकोणत्या भूमापन क्रमांकातून/ गट क्रमांकमधून जाणार आहेत. त्या भूमापन क्रमांकाची / गट क्रमांकाची नोंद असलेली नोंद वही तयार करुन जिल्हाधिकारी कार्यालयास उपलब्ध करुन दयावी म्हणजे तेवढ्या जमिनीचे भूमापन क्रमांक / गट क्रमांक वगळून इतर जमिनींसाठी ' ना हरकत' दाखल्याची आवश्यकता राहाणार नाही.

३) सार्वजनिक बांधकाम विभागाने राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्गासह पूर्ण जिल्हयामध्ये इतरही अस्तित्वात असलेल्या व प्रस्तावित असलेल्या रस्त्यांच्या जमिनींच्या भूमापन क्रमांकांची/ गट क्रमांकाची नोंदवही तयार करुन जिल्हाधिकारी कार्यालयास द्यावी. म्हणजे नेमके तेवढेच भूमापन क्रमांक / गट क्रमांक वगळता उर्वरित भूमापन क्रमांकासाठी / गट क्रमांकासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 'ना हरकत' दाखल्याची आवश्यकता लागणार नाही.

४) अर्जदाराने अकृषिक परवानगीची मागणी केलेल्या दिनांकापर्यंत रेल्वेकडून कोणताही भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे प्राप्त झाला नसल्यास सध्या अस्तित्वात असलेल्या रेल्वे मार्गाच्या दोन्ही बाजूस ३० मिटर अंतर सोडून बाजूच्या क्षेत्रावर अकृषिक परवानगी मागितल्यास त्यासाठी रेल्वेच्या 'ना हरकत' प्रमाणपत्राची आवश्यकता लागणार नाही.

५) नगर रचनाकारांचे 'ना हरकत' प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांनी दर आठवडयाला नगररचनाकारां समवेत बैठक आयोजित करुन तिथल्या तिथेच त्यांचे अभिप्राय घ्यावेत किंवा आवश्यकता वाटल्यास तातडीने बैठक घेवून नगररचनाकारांचे अभिप्राय घ्यावेत.

६) नागरी जमीन कमाल मर्यादा कायदा, १९७६ जेथे लागू आहे अशा ठिकाणी या कायदयाअंतर्गत झालेल्या निर्णयाची प्रत अथवा तद्अनुषंगिक कागदपत्रे बिनशेती अर्जासोबत जोडलेले असल्यावर पुन्हा या कायद्याखाली आवश्यक ते परवाने /'ना हरकत' प्रमाणपत्रे प्राप्त करण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी जिल्हाधिकारी यांनी अकृषिक परवानगी देतांना सदर कायदयाचे उल्लंघन करणार नाही असे हमी पत्र प्रतिज्ञापत्राचे स्वरुपात अर्जदाराकडून लिहून घ्यावे. सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा यांनी नागरी जमीन कमाल धारणा कायदा लागू असलेल्या क्षेत्रातील अतिरिक्त

-७३१-  (३२)  ७८-

ठरलेल्या भूमापन क्रमांक/ गट क्रमांक ची यादी तयार करुन ती जिल्हाधिकारी कार्यालयास द्यावी म्हणजे जिल्हाधिकारी यांना त्यांचे पातळीवरुन पडताळणी करता येईल. अर्जदारास ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्याचे बंधन घालू नये.

७) भूसंपादक संस्थेकडून प्राप्त होणारे सर्व भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे प्राप्त होत असल्याने त्यांनीच भूसंपादनाचे कागदपत्र तपासून बिनशेतीसाठी प्रस्तावित जमीन भूसंपादनाखाली येते की नाही याची खात्री करावी. त्यासाठी संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यांच्या वेगळ्या 'ना हरकत' दाखल्याची आवश्यकता नाही.

८) त्याचबरोबर संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अकृषिक परवानगी अर्जाशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांची दरमहा बैठक बोलवावी आणि सदर अधिकाऱ्यांकडून तिथल्या तिथे अभिप्राय प्राप्त करुन घ्यावेत म्हणजे अर्जदाराचा अकृषिक परवानगीबाबतचा अर्ज त्वरीत निकाली निघू शकेल.

९) जिल्हाधिकाऱ्यांनी अनावश्यक प्रमाणपत्रे सादर करण्याच्या अटी घातल्या जाणार नाहीत याची खबरदारी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

( विकास देशमुख )
उपसचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी
२) सर्व विभागीय आयुक्त
३) उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
४) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५) ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
८) पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) गृह निर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११) संचालक, स्फोटक द्रव्य प्रतिबंधक संचालनालय
१२)महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, प्रकाश गड,बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१.
१३) सर्व मंत्रालयीन विभाग
१४) जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

PR 2002 पाठविले
संनिशी लिपिक

क्र महसूल /कार्य-३१४ ना/शि/क-२१०
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक :- २६/४/२००२



प्रति,
... महसुलदार सर्व